# वाडा तालुक्यात पेंढा व्यापारी संगनमताने करतात शेतकऱ्यांची लूट विभागवार खरेदी केंद्राची गरज

**वाडा, दि. ३ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील शेतकऱ्यांनी यंदा पावसाच्या भीतीने भात कापणीसोबत घाईघाईने झोडणीलाही सुरुवात केली आहे. झोडणी करून शेतात ठेवलेल्या पेंढ्याला चांगला भाव मिळेल, या आशेवर तो व्यवस्थित रचून ठेवला आहे. मात्र पेंढा खरेदी करणारे स्थानिक व्यापारी लबाडीने भाव कमी करण्यासाठी शकल लढवित आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी किमतीत आपला पेंढा विकावा लागत असल्याचे चित्र सध्या तालुक्यात पाहायला मिळत आहे.

वाडा तालुक्यातील स्थानिक पेंढा खरेदी करणारे छोटे-मोठे व्यापारी संगनमत करून हेतुपूर्वक काही दिवस पेंढा खरेदीकडे पाठ फिरवत आहेत. तसेच मुंबई व वसई शेजारील पट्ट्यात म्हशींच्या तबेल्यांचे व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहेत. तेथे पेंढ्याला मोठ्या प्रमाणात मागणी असून तेथून कुणी व्यापारी थेट पेंढा खरेदी करण्यासाठी येत असेल, तर त्याला हे स्थानिक व्यापारी मज्जाव करत असतात. त्याच्याशी हुज्जत घालून त्याला परत पाठवण्याचे प्रकार केले जातात.

काही दिवसांनंतर अचानक पेंढा खरेदी करण्यास हे स्थानिक छोटे-मोठे चालबाज व्यापारी संगनमत करून शेतकऱ्यांच्या शेतावर जातात. तर त्यांच्याकडून यंदा



पेंढा मुबलक प्रमाणात आहे. पुढे आणखीन भाव कमी होणार आहे.पावसाचा काही नेम नाही, पाऊस पडला तर तुमचा पेंढा वाया जाईल, अशी अनेक भीतीयुक्त कारणे व्यापाऱ्यांकडून पुढे केली जातात. त्यामुळे आधीच अर्थिक अडचणीत असलेला शेतकरी मिळेल त्या भावात पेंढा विक्री करीत आहे.

शेतकऱ्यांच्या अर्थिक अडचणीचा फायदा उठवून स्थानिक व्यापारी संगनमत करून शेतकऱ्यांकडून आगदी कमी भावात पेंढा खरेदी करून त्यांची लूट करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. ही लूट थांबण्यासाठी व पेंढ्याला योग्य हमीभाव मिळावा यासाठी तालुक्यात विभागवार पेंढा खरेदी केंद्र सरकारकडून उभारले जावेत. तसेच शेतकऱ्यांचा अर्थिक स्तर उंचावण्यासाठी सरकारकडून योग्य उपाययोजनांवर भर द्यावा अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# मोखाडा-जव्हारमधील पिके ब्रँड म्हणून विकली जातात - अध्यक्ष प्रकाश निकम

**मोखाडा, दि. ३ : प्रतिनिधी**

प्रशिक्षण शिबिर म्हणजे तुम्हा शेतकऱ्यांना दिलेली माहिती आपणास अनुभवानी ज्ञात आहेच पण त्या माहितीचा उपयोग आपल्या आपण प्रत्यक्ष शेती करताना अडचणी, त्रुटी अथवा पशु पालन यासाठी करावयाचा आहे. मोखाडा, जव्हार येथील तुर,नाचणी, वरी, सडीचे तांदूळ इत्यादी शेती पिके बाजारात ब्रँड म्हणून विकले जातात, असे सांगत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम यांनी येथील स्थानिक शेतमाल व भाजीपाला कसा सेंद्रिययुक्त आणि दर्जेदार आहे व तो शेतकऱ्यांनी कसा विकला पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले.

मोखाडा तालुक्यातील तालुकास्तरीय कृषि व पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पालघर व पंचायत समिती मोखाडा यांच्या संयुक्त विद्यमाने "भव्य शेतकरी मेळावा व पशुपालक प्रशिक्षण शिबिर" मौजे भेंडीचापाडा (सातूर्ली )तालुका मोखाडा येथे आयोजित करण्यात आले होता,त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषद कृषि व पशुसंवर्धन समिती सभापती संदिप पावडे, सभापती युवराज गिरंधले , उपसभापती प्रदीप वाघ, जिल्हा परिषद सदस्य कुसुम झोले, सदस्य हबीब शेख, पंचायत समिती सदस्या अनिता पाटील, लक्ष्मी भुसारे, आशा झुगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

सेंद्रिय शेती व पशुपालन या शेतकऱ्यांसाठी कशा एकमेकास पूरक आहेत. पशुपालन व शेती करणारा शेतकरी हा "जगाचा पोशिंदा" आहे. त्याने शेतीपूरक व्यवसाय केले पाहिजेत, यासाठी सरकारचा शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्ष लाभ देणेचा पारदर्शकपणे लाभ पोहोचला पाहिजे हा मानस असून हा मानस पूर्ण करण्याचा मी वसा घेतला आहे. आपल्याकडील तरुण



वर्ग हा शेतीकडे आकर्षिला पाहिजे त्यांनी अत्याधुनिक शेती केली पाहिजे, असे कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती संदीप पावडे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती युवराज गिरंधले आणि उपसभापती प्रदीप वाघ यांनी शेतकऱ्यांना प्रशिक्षित होऊन शेती व पशुपालन यासाठी या ज्ञानाचा उपयोग करा असे संबोधित केले. प्रशिक्षणास उपस्थित अनुभवी शेतकरी गंगाराम वांगड व सुरेश वांगड यांनी फळबाग लागवड, मोगरा लागवड, भाजीपाला लागवड नर्सरी, याबाबत अनुभव कथन केले. तर वाळू लचके, खोच, यांनी दुग्धजन्य पदार्थ निर्मिती याबाबत आपले अनुभव कथन केले. दिलीप बोढेरे, पळसुंडे, यांनी फळबाग लागवड तर याबद्दल गणेश वांगड सातुर्ली यांनी सेंद्रिय शेती व भाजीपाला लागवड याबाबत शेतकरी व पशुपालक यांना अनुभव कथन करून उद्योगास प्रेरित केले.

यावेळी शेतकरी लाभार्थ्यांना पॉवर ट्रेलर, पॉवर विडर, भात कापणी यंत्र आदि अत्याधुनिक यांत्रिकी शेती करता यंत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. या दोन दिवसीय प्रशिक्षणास मेळाव्यासाठी उपस्थित डॉ. प्रशांत कांबळे, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई, यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. प्रकाश हसनाळकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, कृषि विभागाचे मोहीम अधिकारी विश्वजीत माने यांनी मार्गदर्शन केले. तसेच बँक ऑफ बडोदा चे मुख्यालयाचे मॅनेजर व इतर बँकांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी सातुर्ली सरपंच प्रमिला वांगड, उपसरपंच तुळशीराम वाघ, उपस्थित होते. पंचायत समिती मोखाडाचे गटविकास अधिकारी मधुकर गवळी, डॉ. संजय काकलिज व कृषि अधिकारी आर. के. गोडे व पशुसंवर्धन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# स्कायवॉक वजनदार बॅनरमुळे ठरणार धोकादायक

**वसई, दि. ३ : प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात रहदारीवरचा ताण कमी करण्यासाठी स्टेशन परिसरात स्कायवॉक बनवण्यात आले. परंतु अद्यापही त्या स्कायवॉकचे अधिकृत अभियंत्याकडून शास्त्रशुद्ध पद्धतीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नसल्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात जिवितहानी व वित्तहानी होऊ शकते म्हणून जाहिरातीच्या माध्यमातून मिळणाऱ्या तुटपुंज्या करासाठी वसई, विरार व नालासोपाऱ्या मधील करदात्यांना मृत्यूच्या दाढेत ढकलू नका, अशा संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वजनदार जाहिराती लावल्यामुळे मोठ-मोठे होर्डिंग्स कोसळून नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटना घडलेल्या आहेत. त्याचा बोध घेऊन शासनाने व महापालिकांनी जाहिरातींसाठी निश्चित अशी नियमावली केलेली आहे. परंतु वसई विरार महापालिका आपल्या लाडाच्या जाहिरात कंपनीवर विशेष मेहर नजर दाखवत असल्यामुळे मुदत संपल्यानंतरही बेकायदेशीररित्या कर बुडवून सर्रासपणे मोफत जाहिराती लावल्या जात आहेत. त्यामुळे महापालिकेचे लाखो रुपयांचे उत्पन्न बुडत आहे.

सामान्य नागरिकांकडून कर वसूल करताना नियमांचा पाढा वाचून दमदाटी करणाऱ्या महापालिका प्रशासनाने स्कायवॉकच्या नियमांचे पालन करावे व स्कायवॉकचा टिकाऊपणा, वजन पेलण्याची क्षमता व मजबूतपणा या गोष्टी तपासून वजनदार जाहिराती लावल्यामुळे स्कायवॉकला पडलेले मोठमोठया छिद्रांमुळे स्काय वॉक कमजोर तर झालेला नाही ना?, हे तपासावे व स्कायवॉकवर किती वजनाचे बॅनर लावावेत यासाठी अधिकृत अभियंत्याकडून स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी मागणी होत असताना महापालिका याबाबतीत मुगगिळून गप्प आहे. रेल्वे स्टेशन,स्कायवॉक,बस स्टॅन्ड व हायवे प्राधिकरणाला अनधिकृत जाहिरातींच्या बाबतीत सूचना दिलेल्या असून त्यावर कारवाई केली जाणार, असे महापालिका प्रशासन सांगत आहे. या वजनदार जाहिराती लावल्यामुळे दुर्घटना घडून नागरिक मृत्युमुखी पडावेत याची तर महापालिका वाट बघत नसेल ना?,स्कायवॉक हस्तांतराचे कोणतेही पुरावा महापालिका देत नसून 'देतो व घेतो' अशी ठरलेली शासकीय उत्तरे देऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करीत आहे. स्कायवॉकच्या बाबतीत भविष्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन स्ट्रक्चरल ऑडिट करून जर महापालिकेने उपायोजना केल्या नाहीत तर संभाव्य दुर्घटनेत नागरिक जखमी किंवा मृत्युमुखी पडलेत तर त्याला महापालिका प्रशासन जबाबदार असेल असा इशारा देण्यात आलेला असून नवनिर्वाचित आमदारांनी या गंभीर घटनेकडे विशेष लक्ष द्यावे व सामान्य नागरिकांना सुरक्षा पुरवावी अशी मागणी होत आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महापारेषणमध्ये उत्साहात साजरी

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी पुष्पहार



अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्य अभियंता महेंद्र वाळके, सुनील सूर्यवंशी, भूषण बल्लाळ, किशोर गरूड, श्रीमती जुईली वाघ, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) अभय रोही, अधीक्षक अभियंता अमित नाईक, श्रीमती ज्योती चिमटे, शिष्टाचार अधिकारी सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, कार्यकारी अभियंता श्रीकांत पेटकर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याविषयीची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती भारती कांबळे यांनी मानले.

# महामार्गावर अवैध धंद्यांचे 'पीक' ढाब्यांवर अनधिकृत धंद्यांना जोर

**बोईसर, दि. ३ : प्रतिनिधी**

मनोर, कासा आणि तलासरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत खरेदी-विक्रीचे अनधिकृत धंदे जोरात सुरू आहेत. त्यांच्यावर पालघर जिल्ह्यातील पोलीस कारवाई करत नसल्याने महामार्गावर माफियाराज निर्माण झाले आहे. महामार्गालगतचे ढाबे आणि अन्य ठिकाणी बेकायदा सुरू असलेले अवैध धंदे आणि माफियांवर कारवाईची मागणी केली आहे. काही धाब्यांच्या मागील बाजूला लोखंडी सळया खरेदीचा अवैध धंदा जोरात सुरू आहे. याठिकाणी महामार्गावर सळया वाहतूक करणाऱ्या ट्रकमधून मोठ्या प्रमाणात माल उतरवला जातो. आठ ते दहा टन वजनाच्या सळया साठवल्यानंतर त्या सळया दुसऱ्या ट्रकमध्ये भरून भिवंडी व अन्य ठिकाणी विक्री केली जाते.

गुजरात-मुंबई महामार्गाच्या मार्गिकेलगत केमिकल, डांबर, डिझेल आणि लोखंडी सळया खरेदीचे अवैध धंदे सुरू करण्यात आले आहेत. महामार्गावर लोखंडी सळया ट्रकमधून अवैध धंद्याच्या ठिकाणी बेकायदा उतरवल्या जातात. ठराविक टन वजनाच्या सळया साठवल्यानंतर बनावट बिलाच्या साह्याने त्या ट्रकमध्ये भरून गुजरात आणि मध्य प्रदेशात पाठवल्या जात असल्याची माहिती समोर येत आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विरार ते तलासरी यादरम्यान टँकर, ट्रक विश्रांतीसाठी ढाब्यांवर थांबले असता ढाब्यांच्या मागच्या बाजूला ट्रक-टँकरमधून सामान उतरवले जात असते. हा चोरीचा माल ढाबे चालकांकडून किंवा त्यांच्यामार्फत अन्य लोकांना विकण्याचं काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यामध्ये आर्थिक व्यवहार होत असल्याने पोलिसांकडून यावर कारवाई करणे टाळले जाते, असे स्थानिकांकडून सांगितले जाते.

मनोर पोलिसांच्या कारवाईनंतर काही महिने हे अवैध धंदे काही काळासाठी बंद झाले होते. त्यानंतर अवैध धंद्यांचे माफिया पुन्हा सक्रिय झाले आहेत. तर हा भूखंड नेमका आहे तरी कुणाचा या भूखंडाचा वापर अवैध कृत्यांना पाठबळ देण्यासाठी आहे का ? स्थानिक तलाठी व मंडळ अधिकारी या भूखंडावर सुरू असलेल्या या अवैध वापराबाबत नेमकी कुठली कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'फराळ सखी' उपक्रमाला निती आयोगाची मान्यता

**भाईंदर, दि. ३ : प्रतिनिधी**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महिला सक्षमीकरणासाठी सुरू केलेल्या 'फराळ सखी' या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला असून, उपक्रम यशस्वी ठरला आहे. या उपक्रमाची दखल केंद्र सरकारच्या निती आयोगाने घेऊन उपक्रमाला मान्यता दिली आहे. त्यामुळे कायमस्वरूपी महिलांना प्रशिक्षित करून त्यांना उद्योजक म्हणून घडवण्यासाठी नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचातर्फे 'अवॉर्ड टू रिवॉर्ड' या मोहिमेचा मिरा भाईंदर महानगरपालिकेत शुभारंभ करण्यात आला आहे. मिरा भाईंदर शहरातील महिलांना कायमस्वरूपी उद्योग, रोजगार आणि बाजारपेठ मिळावी यासाठी आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांच्या संकल्पनेतून 'फराळ सखी' हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत महिलांना व्यवसायिक पद्धतीने फराळ बनवून त्याची विक्री करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र यंत्रणा उभारली होती. महापालिकेने उभारलेल्या मध्यवर्ती स्वयंपाकघरात बचत गटातील महिलांनी व्यावसायिक पद्धतीने दिवाळीचा फराळ केला होता. महापालिकेने महिलांना फराळ विक्रीसाठी जागा उपलब्ध करून दिली असून त्याची जाहिरात महापालिकेतर्फे करण्यात आली होती. या उपक्रमाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि दिवाळीत तब्बल ३ टन फराळाची विक्री झाली. या उपक्रमाची दखल केंद्र शासनाच्या निती आयोगाने घेतली आहे. नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचातंर्गत अवॉर्ड टू रिवॉर्ड उपक्रमसाठी फराळ सखीला मान्यता देण्यात आली आहे. नीती आयोगाच्या प्रमुख आर्थिक सल्लागार ऍना रॉय यांच्या हस्ते ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, शहर अभियंता दीपक खांबित आणि उपक्रमाच्या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या २५ महिला उपस्थित होत्या. निती आयोगाच्या मान्यतेमुळे शहरातील महिलांना प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्यातील कौशल्य विकसित करून कायमस्वरूपी रोजगार मिळवून देण्यासाठी तयार केले जाणार आहे. या उपक्रमासाठी मिरा भाईंदर शहरातील २५ महिलांची निवड करून त्यांना व्यवसायासाठी लागणाऱ्या सर्व बाबींचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी सेंटर फॉर एज्युकेशन, गव्हर्नन्स अँड पब्लिक पॉलिसी सीईजीपी फाऊंडेशन यांच्यामार्फत राबवली जाणार आहे.

# उल्हासनगर मध्ये गौमांस विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**ठाणे, दि. ३ : प्रतिनिधी**

उल्हासनगर शहरात गौमास विक्री खुले आम होत असुन यांच्यावर गुन्हे दाखल होत असताना सुध्दा हे दुकानदार मास विक्री करत आहेत. काल कॅंप ३ येथील सम्राट अशोक नगर मध्ये गौमास विक्री करणाऱ्या तीन जणांवर मध्यवर्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन ३०० किलो मास जप्त केले आहे. उल्हासनगर कॅंप ३ येथील सम्राट अशोक नगर येथे सलिम शेख हा गौमास विक्री करत असल्याची माहीती मध्यवर्ती पोलिसाना मिळाली तेव्हा पोलिसानी सलिम मटन शॉप वर धाड मारली असता दुकान मालक सलिम हा पळुन गेला. दरम्यान पोलिसानी दुकानाची झाडाझडती केली, तेव्हा ३०० किलो गौमास मिळुन आले. दरम्यान पोलिसानी मिलिंद तायडे पोलिस हवालदार यांच्या तक्रारीवरुन सलिम शेख , सैय्यद इब्राईम रहिमानी (२०) इर्शाद नबी हुसेन कुरेशी (२९) यांच्यावर गु .र. ६/२०२५ बी एन एस कलम ३२५ . ३(५) महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनियम कलम ५,५ (ब ) ५( क ) ९ , ९ ( अ ) प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आशा निकम ह्या करत आहेत.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती

**पालघर, दि. ३ : प्रतिनिधी**



जिल्हा परिषद पालघर येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रूपाली सातपुते यांनी सावित्रीबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल महत्वपूर्ण माहिती उपस्थितांना दिली.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी,शिक्षणाधिकारी प्राथमिक सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी माध्यमिक संगीता भागवत, शिक्षणाधिकारी योजना शेषराव बडे, मोहीम अधिकारी (कृषी) विश्वजित माने तसेच इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# पेल्हार परिसरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**वसई, दि. ३ : प्रतिनिधी**

वसई विरार महापालिकेच्या पेल्हार प्रभाग समिती अंतर्गत सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून ती निष्कासित करण्यात आली. याकारवाईत दहा फुटाहून अधिकची अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली.

पेल्हार प्रभाग समितीच्या पाण्याची टाकी परिसरात सुरु असलेले सुमारे दोन हजार चौरस फुटाचे बांधकाम जेसीबी मशिनच्या मदतीने उध्वस्त करण्यात आले. तसेच अनधिकृत भिंतही पाडण्यात आली. तसेच पेल्हारमधीलच उमर कंपाऊंडमध्ये सुरु असलेले आठ हजार चौरस



फुटाचे अनधिकृत बांधकाम जेसीबीच्या साहय्याने पाडण्यात आले. आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांच्या आदेशाने उपायुक्त दीपक सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती पेल्हारचे सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी, आचोळे प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त मोहन संखे, ठेका अभियंता भाविक नाईक, मनिष पाटील, अरुण सिंग, जितेश पाटील यांच्यासह कर्मचारी, मजूर, एमएसएफचे कर्मचारी, अधिकारी यांच्या पथकाने ही मोहिम पार पाडली.

# पोलीस स्थापना दिनानिमित्त कार्यक्रम

**भाईंदर, दि. ३ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने २ जानेवारी हा महाराष्ट्र राज्य पोलिसांचा स्थापना दिवस म्हणून मान्यता दिली आहे.त्या अनुषंगाने मिरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तलयाच्या हद्दीत 2 ते 8 जानेवारी या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून पोलीस स्थापना दिन सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे.

मिरा-भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तलयाच्या हद्दीत परीमंडळ ०१ च्या अंतर्गत एकूण सात पोलीस स्टेशन असून " पोलीस रायजींग सप्ताहच्या अनुषंगाने रायजींग सप्ताहाचे पोलीस उन्नत दिनाचे महत्व पटवुन देण्यासाठी स्थानिक पोलीस शाळा कॉलेज मध्ये जात विध्यार्थीयांना भेटू देऊन त्यांना नवीन फौजदारी कायद्या संदर्भात, सायबर क्राईम, अंमलीपदार्थ संदर्भात, वाहतुक नियमन संदर्भात, महिला सुरक्षा संदर्भात माहिती देवुन जनजागृती करण्यात येत आहे. जवळपास १०० हुन अधिक विध्यार्थ्यांना भेट देऊन त्यांना माहिती देण्यात आली आहे. याच बरोबर जेष्ठ नागरिकांसाठी देखील या सप्ताह दरम्यान पोलीस ठाण्यात कार्यक्रम आयोजित करत त्यांना देखील ऑनलाईन फसवणूक, गुन्हे, सायबर क्राईम बाबत माहिती देत त्यांना असणाऱ्या समस्या जाणून घेत त्यावर समाधान करण्यात येणार आहे.

पोलीस समुदाय संपर्क वाढवण्याच्या उद्देशाने वाहतूक, सुरक्षितता आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर शाळा-महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांशी पोलिस अधिकारी संवाद साधणार आहेत.शालेय मुलांना पोलीस ठाण्यात भेट देऊन पोलिस स्टेशनच्या प्रभारींसोबत संवादात्मक सत्र करण्यात येणार आहे. पोलिसांची शस्त्रे आणि मुलांना आवडीचे आणि कुतूहलाचे इतर लेखही दाखवण्यात येणार आहेत.पोलिस आणि समाजाशी संबंधित विषयांवर पथनाट्य,तक्रारदारांना मौल्यवान "मुद्देमाल" परत करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग**
**सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर**
**ई मेल eepipcd@gmail.com**

**ई-निविदा सुचना क्र. ०५ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर (सुर्या प्रकल्प वसाहत मनोर ता.जि. पालघर), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये. |
|---|---|---|---|
| १. | वाघ ल.पा. योजना, ता. मोखाडा जि. पालघर प्रकल्पाच्या आपत्कालीन कृती (EAP) आराखडा तयार करणे व आवश्यक लाल व निळी रेषा निश्चिती करण्यासाठीचे सर्वेक्षणाचे काम. | पालघर | रु.८३,७४,०४४/- |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधीः | दिनांकः ०६/०१/२०२५ (सकाळी १०.०० वा.) ते दिनांकः १३/०१/२०२५ (सायंकाळी ०४.४५ वा.) |
| ई-निविदा उघडणेः | दिनांक:- १४/०१/२०२५ (सायंकाळी ५.०० वाजता शक्य झाल्यास) |

**जा. क्र. पापाप्रबांवि/सुर्या/लेशा-२ / ०३ /सन २०२५**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर**
**दिनांक:- ०१ / ०१/२०२५**

**(दि.श्री.शेवाळे)**
**कार्यकारी अभियंता,**
**पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग,**
**सुर्यानगर ता.डहाणू जि. पालघर**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/२७४**

पालघर
शनिवार, ४ जानेवारी २०२५
महासागर


# यशवंत पाटील ज्ञानदीप शिक्षण मंडळाचे अध्यक्ष

## हरेश्वर भगत सचिव, अरुण पाटील उपाध्यक्ष, प्रदीप माळवी खजिनदार; बिनविरोध निवडीची परंपरा कायम

**वसई, दि. ३ : प्रतिनिधी**

वसई पूर्वेकडील वालीव येथील ज्ञानदीप शिक्षण मंडळाच्या कार्यकारिणीची बिनविरोध निवडीची प्रक्रिया याहीवेळी कायम राहिली. मंडळाच्या अध्यक्षपदी सेवाज्येष्ठतेनुसार यशवंत पाटील यांची बिनविरोध निवड झाली. तर सचिवपदी हरेश्वर भगत, उपाध्यक्षपदी अरुण पाटील आणि खजिनदारपदी प्रदीप माळवी यांचीही बिनविरोध निवड झाली.

ज्ञानदीप शिक्षण मंडळ संचलित ज्ञानदीप विद्यामंदिर शाळेत झालेल्या सभेत संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहमतीने सेवा जेष्ठतेनुसार संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व खजिनदार यांची बिनविरोध निवड करण्यात आल्यामुळे एक आदर्श संस्था कशी असावी याचा पायंडा या बिनविरोध निवडणूकीच्या माध्यमातून परिसरात निर्माण झाला आहे.

लोकशाहीत जरी निवडणूक प्रक्रिया अपरिहार्य असली तरी संस्थेत एकमताने कारभार होण्यासाठी काळाची व वेळेची निकड लक्षात घेता बिनविरोध निवडणूक होणे फायद्याचे असते. वसई पूर्वेतील कला, क्रीडा, सांस्कृतिक, विज्ञान व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेली व नावलौकिक मिळवलेल्या ज्ञानदीप विद्यामंदिर या शाळेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध पार पडली. त्यामुळे शाळेतील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद



व्यक्त केला व सर्व संस्था चालकांचे मनापासून अभिनंदन केले.

या सभेत संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहमतीने ज्ञानदीप शिक्षण मंडळाचे विद्यमान सचिव यशवंत पाटील यांची सेवाज्येष्ठतेनुसार संस्थेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून पुन्हा एकदा अरुण पाटील यांची निवड करण्यात आली असून सचिवपदी हरेश्वर भगत व खजिनदार म्हणून प्रदीप माळवी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हभप स्व. गोविंद पाटील यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने शाळा स्थापन करून नावारूपास आणून वैभव प्राप्त करून दिले. स्व. गोविंद पाटील यांनी लावलेल्या इवल्याशा रोपट्याला वटवृक्षात रूपांतर करण्याची जबाबदारी आपल्या सहकाऱ्यांवर टाकून दुर्दैवाने इहलोकीच्या यात्रेला निघून गेले.

त्यानंतर माजी अध्यक्ष स्व. भालचंद्र भगत यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्यांच्या आर्थिक सहकार्याने ज्ञानदीप कनिष्ठ महाविद्यालयाची मुहूर्त मोड रोवण्यात आली. तसेच शाळेवर निस्सीम प्रेम करणारे लक्ष्मण पाटील यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत शाळेवर विशेष लक्ष दिले. नवीन इमारतीसाठी मोठी देणगी देऊन सर्व पदाधिकाऱ्यांच्या मदतीने नवी वास्तू उभी केली तसेच शाळेसाठी जास्त वेळ व पैसा देणारे दानशूर व उदारमतवादी व्यक्तिमत्व असलेले लक्ष्मण पाटील आपल्या कर्तृत्वाने विशेष ठरतात.

# आम्ही मुख्यमंत्र्यांकडे जाऊन घेऊ - आ. कथोरे

**बदलापूर, दि. ३ : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात भाजपाचे माजी नगरसेवक हेमंत चतुरे यांनी बदलापूर मधील एका कार्यक्रमात शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे पत्रकारांशी बोलताना आमदार कथोरे यांनी सांगितले की, "आम्हाला जर फोडाफोडी करायची असती तर आम्ही बरेच फोडू. ते उपमुख्यमंत्र्यांकडे घेऊन जातात आम्ही मुख्यमंत्र्यांकडे जाऊन घेऊ, अशा शब्दात आमदार किसन कथोरे यांनी शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांना सूचक इशारा दिला आहे. दोनच दिवसांपूर्वी भाजपचे माजी नगरसेवक हेमंत चतुरे यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. त्या पार्श्वभूमीवर कथोरे यांचे वक्तव्य महत्वाचे मानले जाते. विधानसभा निवडणुकीत हेमंत चतुरे यांनी बंडखोरी केली असल्यामुळे त्यांची पक्षातून हकालपट्टी केली असल्याचे सांगितले आहे. आमदार किसन कथोरे यांनी शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्यात विधानसभा निवडणुकीपासून संघर्ष सुरू आहे. एकमेकांवर सातत्याने ते टीकास्त्र सोडत आहेत.



कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे भाजपचे माजी नगरसेवक हेमंत चतुरे यांनी वामन म्हात्रे आयोजीत आगरी महोत्सवाच्या दरम्यान शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी हा प्रवेश घडवून आणला. त्यातच दोन दिवसांपूर्वी म्हात्रे यांनी चतुरे यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेटही घालून दिली. चतुरे हे भाजपचे बदलापूर गावातील नगरसेवक होते. याच प्रभागात भाजपचे आमदार किसन कथोरे यांचेही निवासस्थान आहे. त्यामुळे चतुरे यांचा वामन म्हात्रे यांनी प्रवेश घडवून आणणे यामागे शहरात राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

# ट्रॉमा केअर सेंटर 2025 मध्ये तरी सुरु होईल का ?

## महामार्गावरील ट्रॉमा सेंटरचे काम रखडले

**पालघर, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबई अहमदाबाद महामार्गावरील मनोरजवळील टाकवाहळ येथील ट्रॉमा केअर सेंटर पूर्णपणे सुरू होण्यास अजून नऊ ते दहा महिन्याचा कालावधी लागणार आहे. 2018 ला हे ट्रॉमा केअर सेंटर सेवेत येणे अपेक्षित असताना 2025 ला सुद्धा हे सुरू होईल की नाही याबद्दल शंकाच असल्याने अपघातग्रस्त जखमींना व ग्रामीण भागातील रुग्णांना अजून किती काळ रुग्णसेवेपासून वंचित राहावे लागणार आहे हे आजच्या घडीला सांगणे मुश्किल आहे.

मनोर भागात महामार्गालगत 2017 मध्ये 200 खाटाच्या ट्रॉमा केअर सेंटरसाठी 50 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या ट्रॉमा केअर सेंटरच्या इमारतीची 90 टक्के काम झाले आहे. यासाठी विविध प्रकारचे चार विभाग काम करत आहेत. यांचे काम वेळेत झाले असते तर असंख्य लोकांचे प्राण वाचू शकले असते. मात्र हे रुग्णालय सहा वर्षांपूर्वी सुरु होणे अपेक्षित असताना ते आजतागायत सुरू झालेले नाही या इमारतीचे काम करणाऱ्या ठेकेदाराला दररोज 70 हजार रुपये दंड अकारला जात आहे. अजून पर्यंत 58 लाख रुपये दंडाची रक्कम झाली आहे. ती लवकरात लवकर वसूल करावी व दंडाच्या रकमेत वाढ करावी, असा आदेश पालघर विधानसभेचे आमदार राजेंद्र गावित यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अभियंतांना देत कोणाचा फोन आला तरी घाबरू नका मला सांगा मी बोलीन, मात्र हे काम लवकरात लवकर करण्यात यावे व ठेकेदाराला वाढीव दंड आकारण्यात यावा अशा सूचना त्यांनी त्यावेळेस दिल्या.



ट्रॉमा केअर सेंटर हे जानेवारी फेब्रुवारी मध्ये सुरू होईल असे बोलले जात होते. मात्र, विद्युत कामासाठी साधारण सहा महिने लागणार आहेत, असे विद्युत काम करणाऱ्या कंपनीने सांगितले. म्हणजे जूनपर्यंत हे काम चालणार आहे. सब स्टेशनचे काम होणे बाकी आहे. यामध्ये अकरा लिफ्ट आहेत. त्याची तपासणीसाठी ही वेळ लागणार आहे. त्यामुळे त्यात विलंब होणार आहे. रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. तो अजूनपर्यंत मान्य झालेला नाही. याचा पाठपुरावा सुरू असल्याचे मुंबई मंडळ ठाणे विभागाचे आरोग्य उपसंचालकानी आमदार गाविताना माहिती देताना सांगितले.

रुग्णालयासाठी 24 तास पाणीपुरवठा करावा लागणार आहे. यासाठी साडेसहा किलोमीटर लांबीची पाईपलाईनचे काम आहे. जमीन अधिग्रहणाचा प्रश्न प्रलंबित असल्यामुळे अजूनपर्यंत साडेचार किलोमीटर लांबीची पाईपलाइनचे काम प्रलंबित आहे. रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या उपकरणाचा प्रस्ताव शासनाकडे अजून पडून आहे. हा प्रस्ताव पास होत नाही तोपर्यंत उपकरणे मिळणार नाहीत. ट्रॉमा केअर सेंटरच्या इमारतीचे काम झाले आहे. मात्र, त्यासाठी लागणारी उपकरणे नाहीत. त्यामुळे 2025 मध्ये तरी ट्रॉमा केअर सेंटर सुरू होईल का याबद्दल शंका व्यक्त केली जात आहे.

# वांद्री धरणाच्या कालव्याचे पाणी महामार्गावर

## ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे वाहनचालक त्रस्त



**मनोर, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबई अहमदाबाद महामार्गावरील सातीवली गावच्या हद्दीत ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे वांद्री धरणाच्या कालव्याचे पाणी दोन दिवस महामार्गावर साचून राहिले होते. तक्रार आल्यानंतर ठेकेदाराने बुजवलेला नाला खोदकाम करून पाण्याच्या प्रवाहातील अडथळा दूर केला. पण, पाणी वाहून खोदलेल्या खडड्यामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

मुंबई अहमदाबाद महामार्गावरील सातिवली गावाच्या हद्दीत दर्शन हॉटेलसमोर वांद्री धरणाच्या कालव्याचे पाणी साचले होते. दोन दिवसांपासून साचलेल्या पाण्यामुळे मुंबई वाहिनीवरील एका मार्गीकेवरील वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अभियंत्यांना माहिती दिल्यानंतर ठेकेदार कंपनी निर्मल इन्फ्रा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सकाळी पोकलेन मशीनच्या साहाय्याने दर्शन हॉटेल समोरचा बुजवलेला नाला खोदकाम करून पाण्याच्या प्रवाहातील अडथळा दूर केला. परंतु पाणी वाहून जाण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे मुंबई वाहिनीच्या एका मार्गीके वरील वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे.

ठेकेदारा कडून दर्शन हॉटेल समोर खोदलेल्या खड्ड्याच्या ठिकाणी धोका दर्शवणाऱ्या सूचना तसेच वाहन चालकांना माहिती देणारे फलक लावण्यात आले नाहीत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महामार्गावर साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून दर्शन हॉटेल समोरील धोकादायक खड्डा बुजवण्याची मागणी वाहन चालकांकडून केली जात आहे.

> सातिवलीच्या दर्शन हॉटेलसमोर पाणी वाहून जाण्यासाठी खोदलेल्या खड्ड्याच्या ठिकाणी धोका दर्शवणाऱ्या सूचना तसेच वाहन चालकांना माहिती देणारे फलक लावण्याचे निर्देश ठेकेदार कंपनीला देण्यात आल्या आहेत.तसेच वाहन चालकांच्या सुरक्षेसंबंधित उपाययोजना केल्या जातील याची खात्री केली जाईल.
>
> **-अजय शर्मा, व्यवस्थापक, महामार्ग सल्लागार कंपनी.**
>
> मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीकडून वाहन चालकांच्या सुरक्षे संबंधित उपाययोजना करण्याच्या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून वाहन चालकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे. हॉटेल समोरच्या खड्ड्यामुळे अपघात होऊन जीवितहानी झाल्यास ठेकेदार कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न केला जाईल.
>
> **-अनिकेत गायकवाड, ग्रामस्थ.**

# उल्हासनगर महापालिकेची इमारत बनणार 15 मजली

**उल्हासनगर, दि. ३ : प्रतिनिधी**

उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त विकास ढाकणे यांनी महापालिकेची नवीन इमारत १५ मजली बनवन्याची योजना आखली असुन ही इमारत पिरामीड आकाराची असणार आहे. या इमारतीला ४१० कोटीचा निधी लागणार आहे. या इमारतीचे काम सुरु होणार तेव्हा महापालिकेचे कामकाज हे प्रांत कार्यालयातील प्रशासकीय इमारतीत मध्ये सुरु होणार आहे.

उल्हासनगर महापालिकेची ही इमारत ३ जुन १९७६ साली तयार झाली असुन तीन मजल्यावर महापालिकेचे कामकाज चालते. दरम्यान सध्यस्थितीत ही इमारत धोकादायक झाली असल्याने या इमारतीचे पुनर्निमाण होणे आवश्यक आहे.तेव्हा आयुक्त विकास ढाकणे यांनी लवकरात लवकर ही इमारत तोडुन त्या जागी पिरामिड आकाराची १५ मजली इमारत उभी करण्याचा प्लान तयार केला आहे. या इमारतीची डिझाईन आर्किटेक्ट हितेन शेट्टी यांनी तयार केली आहे. तर लवकरात लवकर ४८ वर्ष जुनी झालेली ही इमारत तोडण्याचे काम सुरु होणार आहे. या इमारतीला ४१० कोटी रुपये खर्च लागणार असुन या सोबतच आयुक्त विकास ढाकणे यांनी मिशन-५० चा संकल्प केला आहे. या संकल्पा अंतर्गत एम एम आर डी ए चे ७ कॉंक्रीट चे रोड मार्च २०२५ पर्यंत पुर्ण होणार आहेत. तर यातील पाच रोड ला आकर्षक लुक देण्यात येणार असल्याचे आयुक्तानी सांगितले आहे. महापालिकेची स्वतंत्र पाणी योजना निर्माण करण्यात येणार असुन , सीमा विस्तार करुन बाजुच्या गांवाना महापालिकेत सामाविष्ट करण्यात करण्याचा प्रयत्न , बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलाचे काम पुर्ण करणे , कबड्डी कोचिंग व्यवस्था , महापालिकेची वेबसाईड अपडेट करणे , आदर्श शाळांचा विकास करणे , सपंती व्यवस्थापन डिजिटल प्लॅटफॉर्म वर आणणे , झोपडपट्ट्या मध्ये हिरकणी अभ्यासिका सुरु करणे, के बी रोडवर मल्टीलेवल उड्डाण पुल तयार करणे, बॅडमिंटन , टेनिस, आर्चरी, हॉलीबॉल , बास्केटबॉल इत्यादी योजना कार्यांवित करण्याचा मिशन - ५० चा संकल्प हा आयुक्तानी जाहीर केला आहे.

# बालिका दिनी संघर्ष संघटनेकडून विशेष व्यक्ती व संस्थांचा सन्मान

**सफाळे, दि. ३ : प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त देवभूमी सभागृह सफाळे येथे संघर्ष संघटना महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने सावित्रीच्या लेकी, सेवाभावी व क्रांतीज्योती पुरस्कार सोहळ्याचे आयोजन आज शुक्रवार (दि.३) रोजी करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून संघटनेच्या अध्यक्षा सुमनताई मानकर, प्रमुख पाहुणे केळवे पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक विजया गोस्वामी, सफाळे उंबर गृप ग्रामपंचायतीच्या सरपंच तनुजा कवळी, संघर्ष संघटनेचे राज्य सचिव आर.बी. सिंग, पी.एस.आय.ज्ञानेश्वर सावंत, मुख्य सेविका सुरेखा सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास सामाजिक , शैक्षणिक, आरोग्य, बचत गट, अंगणवाडी सेविका, शाळा महाविद्यालय यामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला.

संघर्ष संघटनेच्या अध्यक्षा सुमन मानकर मनोगत व्यक्त करत करताना म्हटल्या की, संघटनेतर्फे काम करताना मला देखील लोकांच्या दगड धोंड्याचा सामना करावा लागला. संघर्ष करावा लागला. माझ्यावर अनेकदा हमले देखील झाले. तरीदेखील मी न डगमगता संघटनेच्या सोबत राहून अन्याय सहन करणाऱ्या माझ्या बहिणींना धीर दिला. संघर्ष करत राहिल्याने आज विविध सरकारी कार्यालयामध्ये ग्रामस्थांची कामे सहज होत आहेत. आतापर्यंत २२,००० पेक्षा जास्त सदस्य संस्थेस जोडले गेले आहेत. विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य पुरवणे, अडीअडचणीमध्ये नागरिकांना मदत करणे, सरकारी योजना मिळण्यासाठी महिलांना सहकार्य करणे, महिला सक्षमीकरण करणे अशी अनेक कामे संस्थेमार्फत करते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या विजया गोस्वामी यांनी म्हटले की, आजच्या काळामध्ये मोबाईल आणि सोशल मीडियाचे प्रमाण खूप वाढले आहे. माझ्या कोणत्याही महिला भगिनीला सोशल मीडियाच्या माध्यमातून त्रास देण्याचा कोणी प्रयत्न करत असेल तर मी तिच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील. सावित्रीबाई फुले नसत्या तर माझ्यासारखी महिला पोलीस क्षेत्रामध्ये आली नसती. हे क्षेत्र जरी खडतर असले तरी सुद्धा महिलांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य यामुळे बजावता येते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्याध्यक्ष नितीन पाटील यांनी केले. सूत्रसंचालन जतिन कदम यांनी केले तर वसई तालुका महिला सचिव सारिका गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.

# सक्षमीकरणासाठी कलिंगड रोपांचे वाटप



**डहाणू, दि. ३ : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी सर नेस वाडिया फाउंडेशनने कासा येथील सायवन आणि रायपूर याठिकाणी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला. या उपक्रमाअंतर्गत कासा परिसरातील आष्टे, सायवन, रायपूर, मोडगाव, चलनी, दाभाडी, गडचिंचले आणि शेणसरी या गावांतील शेतकऱ्यांना कलिंगड रोपे वाटप करण्यात आली. फाउंडेशनचे जनरल मॅनेजर कुशाला शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांनी कलिंगड लागवडीसाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पन्न वाढवावे आणि त्यांना स्वावलंबनाची दिशा मिळावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी शेतकऱ्यांना दर्जेदार रोपांची उपलब्धता करून देत, त्यांना आधुनिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. कलिंगड लागवड करण्यापूर्वी शेतकऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये शेतकऱ्यांना कलिंगड लागवडीसाठी योग्य प्रकारची जमीन कशी निवडावी याविषयी माहिती पुरविण्यात आली. कलिंगड पिकविण्याच्या पद्धतींची ओळख, मातीचा पोत सुधारण्यासाठी व खतांचा योग्य वापर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, कीड आणि रोगांपासून पिकांचे संरक्षण कसे करावे. याविषयी शेतकऱ्यांना सखोल माहिती देण्यात आली.

शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. उपक्रमाच्या यशामध्ये ओंकार घरत, नरेंद्र मुळे, कैलास लिलका, सुभाष महाले, संतोष कुरकुटे आणि सुभाष सोमण यांनी विशेष मेहनत घेतली.

# अभिजित सांगळे यांना शिवरत्न पुरस्कार



**वसई, दि. ३ : प्रतिनिधी**

राजश्री शिवबा विचार प्रसारक मंडळ (ट्रस्ट)नवी मुंबई यांच्या माध्यमातून नविन वर्षाच्या सुरुवातीला समाजातील समाजसेवक आणि सामाजिक कार्यकर्ते यांना गौरवण्यात येते. यंदा वसईतील अभिजित सांगळे यांना रायगड किल्ल्यावरील सदरेवर झालेल्या सोहळ्यात शिवरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

सांगळे यांनी कोविड काळात परदेशात गेलेल्या पंधरा हजारांहून अधिक नाविक व विद्यार्थ्यांना भारतात सुखरुप आणण्यात महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. ऑल इंडिया सिफेरर्स युनियनच्या मदतीने प्रामुख्याने इराण, दुबई, तुर्की, मलेशिया, इंडोनेशिया, नायझेरिया देशातील नाविक आणि विद्यार्थ्यांना भारतात परत आणण्याचे काम केले गेले आहे याकार्याची दखल केंद्रीय मंत्रालय, गृह आणि विदेश मंत्रालयाने घेऊन प्रशंसा केली होती. अशा अनेक उपक्रमात उल्लेखनिय कार्य केल्याची दखल घेऊन सांगळे यांना शिवरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले.

# अंगणवाड्यांना 'जादुई पिटारा'चे वितरण

## प्रारंभिक बाल शिक्षणाला नवा आयाम

**वसई, दि. ३ : प्रतिनिधी**

वसई-विरार महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी शहरातील ४१३ अंगणवाड्यांना लेसिंग बोर्ड, मासे पकडायचा खेळ, पेग बोर्ड, टच कार्ड्स, मोजणीचे मणी, आईस्क्रीमच्या रंगीत काड्या, प्राण्यांच्या कठपुतळ्या, कठपुतळी, बाहुली, कप्प्यांचा बोर्ड, ध्वनी पेटी, ४ तुकड्यांचे चित्रकोडे, कृती कार्ड, पटावरील खेळ, आकार किट, गोष्टीचे कार्ड, कवितेचे कार्ड, चित्र चर्चा कार्ड, रोल आणि कव्हर मॅट्स, मराठी अक्षरे, हुलाहूप, चेंडू, इमोशन बोर्ड, किट स्टोरेज बॉक्स अशी विविध प्रकारची शैक्षणिक खेळणी (जादुई पिटारा) वितरित करून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

बालकांमध्ये सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि मूलभूत कौशल्ये विकसित करण्यासाठी हा संच तयार



करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत, अंगणवाडी सेविकांना 'जादुई पिटारा' चा प्रभावी उपयोग कसा करावा, याचे प्रशिक्षण देण्यात आले. अंगणवाडी सेविकांना या प्रशिक्षणाद्वारे लहान मुलांसाठी शिक्षण अधिक आकर्षक व समृद्ध कसे बनवावे, याचे मार्गदर्शन करण्यात आले."जादुई पिटारा" चे वितरण हे वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रारंभिक बाल शिक्षण मजबूत करण्याच्या हेतूने एक महत्वाचा टप्पा आहे." जादुई पिटारा" ही केवळ शैक्षणिक संसाधनांची पेटी नसून, ती या बालकांसाठी त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे प्रवेशद्वार आहे. अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेले प्रशिक्षण या संसाधनांचा उपयोग अधिक प्रभावीपणे करण्यासाठी उपयुक्त ठरेल. "जादुई पिटारा" मधील नविन्यपूर्ण संसाधनाच्या साहाय्याने मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर नक्कीच सकारात्मक परिणाम दिसून येईल.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या या "जादुई पिटारा" या उपक्रमामुळे अंगणवाडी प्रणाली अधिक सक्षम होईल आणि मुलांच्या प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाचा पाया अधिक मजबूत होईल. या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील प्रारंभिक बाल शिक्षणामध्ये सकारात्मक परिवर्तन दिसून येईल, यात काय शंका नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

